THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

THURSDAY, 27TH NOVEMBER 1890.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### सन १८८२चें क्रिमिनल प्रोसीजर कोड सुधारण्याबाबत आक्टाचा मसुदा.

सन १८८२चें क्रिमिनल प्रोसीजर कोड सुधारणें ज्याअर्थी योग्य आहे, त्याअर्थी यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे:—

१. सदर्हू कोडाचें कलम २९० हें यावरून रद्द केलें आहे.

सन १८८२चा आक्ट १० वा याचें २५०वें कलम रद्द केलें आहे.

२. सदर्हू कोडांत खालीं दिलेलें कलम जास्त दाखल करावें: तें येणेंप्रमाणें:—

सन १८८२चा आक्ट १० वा याच्या रद्द केलेल्या २५०व्या कलमाऐंवजीं एक नवीन कलम दाखल केलें आहे.

पोकळ अगर त्रासदायक फिर्यादी.

“९६०. (१) फिर्याद करून अगर बातमी दिल्यावरून चालू केलेल्या कोणत्याहि मुकदम्यांत कोणत्याहि माजिस्ट्रेटापुढें कोणत्याहि मनुष्यावर कलम २६०, रकमा (अ) ते (के) यांत निर्दिष्ट केलेल्या अगर हवाला दिलेल्या अपराधांपैकीं कोणताहि अपराध केल्याबद्दल आरोप अणिल्यानंतर तो माजिस्ट्रेट त्या आरोपितास सोडून देईल अगर त्यानें अपराध केला नाहीं असा ठराव करील आणि त्या आरोपितावर आणिलेला आरोप पोकळ व त्रासदायक आहे अशी त्याची खात्री होईल तेव्हां, त्यास, आरोपितास सोडून देण्याच्या अगर त्यानें अपराध केला नाहीं अशा ठरावाच्या हुकुमांत, आपल्या नजरेस येईल त्याप्रमाणें, ज्या मनुष्यानें फिर्याद केल्यावरून अगर बातमी दिल्यावरून तो आरोप आणिला असेल त्या मनुष्यानें त्या आरोपितास आणि ते एकापेक्षां जास्त असतील तेव्हां त्यांपैकीं प्रत्येकास, माजिस्ट्रेटाला योग्य वाटेल तितका पन्नास रुपयांपेक्षां जास्त नाहीं इतका मोबदला दिला पाहिजे असा ठराव दाखल करण्याचा अधिकार आहे.

मात्र, असा कोणताहि ठराव करण्यापूर्वीं त्या माजिस्ट्रेटानें—

(अ) आपल्या मतें जो मोबदला द्यावा असें असेल तो देण्याविषयीं हुकुम कां करूं नये याबद्दल कारण असेल तें दाखवावें असा फिर्यादीस अगर बातमी देणारास हुकुम केला पाहिजे,

(ब) तो फिर्यादी अगर बातमी देणारा तसा हुकुम करण्यास जी कोणतीहि हरकत दाखवील ती दप्तरीं दाखल केली पाहिजे, आणि

(क) आपण कोणताहि मोबदला देण्याचा हुकुम केल्यास, आरोपितास सोडून देण्याच्या अगर त्यानें अपराध केला नाहीं अशा ठरावांत, तो मोबदला देवविण्याचीं आपलीं कारणें लिहून ठेविलीं पाहिजेत.

(२) पोट-कलम (१) यावरहुकुम जो मोबदला देण्याचा माजिस्ट्रेटानें हुकुम केला असेल, तो मोबदला दंडाप्रमाणें वसूल करण्यांत येईल:

मात्र, तो मोबदला जर वसूल करितां आला नाहीं, तर कैदेची शिक्षा द्यावयाची ती नुसती असावी व तो माजिस्ट्रेट हुकुम करील त्याप्रमाणें ती तीस दिवसांहून जास्त मुदतीची नसावी.

(३) आरोपितास मोबदला देण्याबद्दल कोणत्याहि दुसऱ्या किंवा तिसऱ्या वर्गाच्या माजिस्ट्रेटानें पोट-कलम (१) अन्वयें कोणत्याहि फिर्यादीस अगर बातमी देणारास हुकुम केलेला असल्यास त्या फिर्यादीस अगर बातमी देणारास, त्याचा त्या माजिस्ट्रेटानें इन्साफ करून तो अपराधी असल्याबद्दल ठराव केल्याप्रमाणेंच, त्या हुकुमाचा जो भाग तो मोबदला देण्याच्या संबंधाचा असेल त्या भागावर अपील करण्याचा अधिकार आहे.

(४) आरोपितास मोबदला देण्याचा हुकुम ज्या मुकदम्यांत केलेला असेल तो मुकदमा पोट-कलम (३) अन्वयें अपिलास पात्र असेल तेव्हां, तें अपिल करण्यास दिलेली मुदत संपण्यापूर्वी अगर अपील रुजू केलेलें असल्यास त्या अपिलाचा निकाल होण्यापूर्वी तो मोबदला त्यास देऊं नये.

(५) त्याच बाबतीसंबंधी पुढें कोणताहि दिवाणी दावा करण्यांत आला तर, त्यांत नुकसानीचा मोबदला देण्याचा ठराव करते वेळीं, कोर्टानें, या कलमाअन्वयें नुकसानीचा मोबदला ह्मणून जी कोणतीहि रकम देण्यांत आली असेल अगर वसूल करण्यांत आली असेल, ती जमेस धरिली पाहिजे.

सन १८८२चा आक्ट १० वा, कलम ५५२, याचा कांहीं भाग रद्द केला आहे.

३. सदर्हू कोडाचें कलम ५९२ याच्या दुसऱ्या पारिग्राफांत "किंवा एकाहून अधिक मनुष्यांवर फिर्याद झाली असेल" हा मजकूर यावरून रद्द केला आहे.

---

## हेतु कारणें यांचें निरूपण.

फिर्याद केल्यावरून नव्हत, परंतु इतर कारणावरून जे विवक्षित मुकदमे चालू करण्यांत येतात त्यांस सन १८८२ चें क्रिमिनल प्रोसीजर कोड, कलम २५०, यांतल्या ठरावांसारखे ठराव लागू करावे हा ह्या मसुद्याचा मुख्य उद्देश आहे. पहिल्यानें वायव्य प्रांतांतल्या न्यायाच्या हैकोर्टांतील नामदार जज्जांनीं केलेल्या सूचनेस अनुसरून ह्या मसुद्यांत प्रत्येक माजिस्ट्रेटास असा कधिकार देण्याची योजना केली आहे कीं, त्या कोडाच्या २२व्या बाबीअन्वयें संक्षिप्त रीतीनें इन्साफ करण्यास पात्र असा अपराध केल्याबद्दल ज्या कोणत्याहि मनुष्यावर त्या माजिस्ट्रेटापुढें आरोप येऊन जो सोडून देण्यांत येईल अगर ज्यानें अपराध केला नाहीं असा ठराव करण्यांत येईल, त्या मनुष्यास, तो आरोप पोंकळ व त्रासदायक होता अशी त्या माजिस्ट्रेटाची खात्री झाल्यास, पन्नास रुपयांपेक्षां जास्त नाहीं इतकी रकम त्या आरोप करणाराकडून मिळावी, असा त्या माजिस्ट्रेटानें हुकूम करावा. याप्रमाणें मोबदला देण्याचा हुकुम करण्याच्या आधीं त्या माजिस्ट्रेटानें, त्या आरोप आणणाराची तसा हुकुम करण्यास काय हरकत असेल ती ऐकून लिहून घ्यावी, आणि तो हुकुम दुसऱ्या किंवा तिसऱ्या वर्गाच्या माजिस्ट्रेटानें केलेला असल्यास, त्यावरचें अपील जिल्हा माजिस्ट्रेटाकडे किंवा त्या कोडाच्या ४०७व्या कलमांत निर्दिष्ट केलेल्या पहिल्या वर्गाच्या योग्य सबार्डिनेट माजिस्ट्रेटाकडे चालेल.

तारीख १ माहे आक्टोबर सन १८९०.

(सही.) ॲण्ड्रू आर. स्कोबल.

(True Translation.)

Y. M. KELKAR,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS